संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# डॉक्टर आणि रुग्णांच्या सुरक्षिततेचे आव्हान

**निवासी** डॉक्टरांचा संप मिटला असला, तरी डॉक्टर आणि रुग्ण यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अजूनही अधांतरी आहे. रुग्णांच्या नातेवाईकांकडून सातत्याने मारहाणीचे प्रकार घडत असल्यामुळे राज्यातील सरकारी रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी संपाचे हत्यार उपसले होते. धुळे येथील रुग्णालयात एका डॉक्टरला रुग्णाच्या नातेवाईकांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर लगेच दोन दिवसांत अशाच स्वरूपाचा एक हल्ला डॉक्टरवर झाला आणि त्याचा निषेध करण्याकरिता डॉक्टरांना संपावर जाण्याशिवाय पर्याय उरला नाही. नियतीचादेखील किती विचित्र खेळ असतो. आपल्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी जे रुग्ण डॉक्टरांकडे येतात, त्याच डॉक्टरांना सुरक्षिततेची सरकारकडे याचना करावी लागते आहे. तर डॉक्टर जी काही औषधोपचार करतात ते सुरक्षित असतीलच, याबद्दलचा डॉक्टरांवरचा विश्वास उरला नसल्यामुळे आज रुग्ण आणि डॉक्टर या दोघांच्या सुरक्षिततेविषयी मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. धुळे इथल्या प्रकारानंतर राज्यभर संपाचा बडगा उगारला गेला आणि डॉक्टरांनी आपल्यावर हल्ले होणार नाहीत, यासाठी उपाययोजनांची मागणी सरकारकडे केली. सरकारनेदेखील ती मागणी मान्य केली आहे. विशेषतः रुग्णालयात अधिक सुरक्षा व्यवस्था तैनात केली जाईल. बाह्य रुग्ण विभाग आणि अतिदक्षता विभाग याठिकाणी कायमस्वरूपी सशस्त्र पोलिसांची व्यवस्था केली जाणार आहे. रुग्णालयात नातेवाईकांची होणारी गर्दी टाळण्याकरिता पास सिस्टम लागू केली जात आहे. या सर्व उपाययोजनांमधून डॉक्टर स्वतःला अधिकाधिक सुरक्षित करून घेण्याचा प्रयत्न करतील आणि ते करून घेणे सामाजिकदृष्ट्या योग्यही ठरते. परंतु डॉक्टरांवर होणारे हल्ले त्यामागची कारणे हा आता तसा देशच नव्हे, तर जगभरातला चिंतेचा विषय होत आहे. हल्ले का होतात आणि हल्ले का केले जातात. या दोन वाक्यांमध्ये त्यामागचे कारण दडलेले आहे. संयमितपणे आणि सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून विचार केला, तर डॉक्टर काय किंवा रुग्णांचे नातेवाईक काय, या दोन्ही ठिकाणी बेजबाबदारपणाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. कारण जर योग्य ती सामाजिक जाणीव आणि रुग्णांविषयीची संवेदनशिलता दोन्ही पातळ्यांवर जर समान पध्दतीने राहिली तर हल्ले होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. दुर्दैवाने हॉस्पिटल्स, डॉक्टर्स, हॉस्पिटल्समधला स्टाफ या सर्वांकडून रुग्णांच्या नातेवाईकांना फार काही समाधानकारक वागणूक मिळत नाही. तर अनेक वेळेला रुग्णांच्या नातेवाईकांकडून अरेरावी केली जाते. परिस्थिती किंवा वस्तुस्थिती समजून न घेता उपचारांचा आग्रह धरला जातो.

### डॉक्टरी पेशातला व्यापार

ही वस्तुस्थिती तर नाकारून चालणारच नाही. एकेकाळी नोबेल प्रोफेशन किंवा अतिशय पवित्र सेवाकार्य म्हणून डॉक्टरकी पेशाचा सन्मान केला जात होता. विशेष म्हणजे जगभरातील या क्षेत्रातील डॉक्टरांनी रुग्णांच्या मनामध्ये स्वतःचे एक स्थान निर्माण केले होते, त्यातूनच फॅमिली डॉक्टर असे एक भावनिक नाते निर्माण करणारी संकल्पना आकाराला आली होती. म्हणजेच या व्यवसायाचे पावित्र्य टिकवण्याचे काम डॉक्टर मंडळींनीच केले होते, हे लक्षात ठेवले पाहिजे. आज नोबेल या शब्दाची जागा प्रॉफिटेबल या शब्दाने घेतली आहे. केवळ आपला फायदा करून घेणारा हा व्यवसाय आहे, अशा दृष्टिकोनातूनच त्याकडे पाहिले जाते. या व्यवसायाला अत्यंत आवश्यक असलेली संवेदनशिलताच नाहीशी होत चालली आहे. रुग्ण किंवा पेशंट म्हणजे बळीचा बकरा या दृष्टीनेच त्याच्याकडे पाहिले जाते आणि एकाचवेळी एका पेशंटच्या खिशातून किमान तीन लोक किंवा तीन घटक सहजपणे पैसे काढत असतात. त्यामध्ये पॅथेलॉजीवाले, मेडिकल दुकानवाले, प्रत्यक्ष डॉक्टर, या सर्वांचे लक्ष पेशंटकडून अधिकाधिक पैसे काढण्याकडेच असते. मोठ्या रुग्णालयांमध्ये तर स्वतंत्र कस्टमर केअर नावाचा विभाग असतो. याचा अर्थ पेशंट किंवा रुग्णाकडे तिऱ्हाईत म्हणून पाहिले जाते. इतका या क्षेत्रामध्ये व्यापारीपणा बोकाळलेला आहे. ही संवेदनशिलता हरवल्यामुळेच रुग्णांच्या नातेवाईकांची ही सहनशिलता नाहीशी झाली, ज्यावेळी सर्व प्रकारची काळजी घेत हवे तेवढे पैसे खर्च करूनही योग्य ते उपचार होत नाहीत. त्यावेळी रुग्णांच्या नातेवाईकांचा संयम सुटतो आणि त्याचे पर्यवसान त्याच्या मारहाणीत होते. याच ठिकाणी डॉक्टरांनी किंवा रुग्णालयातील अन्य कर्मचारी वर्गाने रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांशी जर संवेदनापूर्ण संवाद ठेवला तर नातेवाईकांइतकीच आम्ही या रुग्णाची घरच्यासारखी काळजी घेत आहोत, असे पारिवारिक वातावरण निर्माण केले तर एक विश्वासपूर्ण परिस्थिती आकाराला येऊ शकते.

### तक्रार नोंदवण्याची व्यवस्थाच नाही

समाजजीवनामध्ये रुग्ण, डॉक्टर हे अतिशय वेगळ्या स्वरूपाचे नाते असते. त्यामध्ये एकमेकांमध्ये विश्वास असणे हा त्यावरचा एकमेव उपाय आहे आणि हा विश्वास निर्माण करणे ही दोघांचीही तितकीच मोठी जबाबदारी ठरते. केवळ गडगंज पैसा गोळा करून स्वतःची आर्थिक सुरक्षितता भक्कम करण्याचा डॉक्टरांचा हव्यास त्यांनी आवरता घेतला पाहिजे. तर रुग्णांच्या नातेवाईकांनी आपल्या रुग्णावर योग्य उपचार होत नसेल तर त्याविरुध्द वरिष्ठांकडे तक्रार केली पाहिजे. आज या सगळ्या वैद्यकीय व्यवस्थेत डॉक्टर्स किंवा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार करण्याची कोणतीच सोय नाही. खरे तर ती जरी व्यवस्था निर्माण झाली, तरीसुध्दा निर्माण होणारा रुग्णाच्या नातेवाईकांचा राग वळवता येईल किंवा शांत करता येईल. अर्थात आजच्या एकूणच धकाधकीच्या जीवनामध्ये ताणतणावाच्या परिस्थितीत तब्येती सांभाळणे हीदेखील प्रत्येकालाच जोखीम वाटू लागली आहे. तातडीने वैद्यकीय मदत न मिळणे किंवा रुग्णालयात घाईगर्दीने आलेल्या रुग्णांची दखलच घेतली न जाणे असेही प्रकार मोठ्याप्रमाणावर घडतात. म्हणून डॉक्टर आणि रुग्ण या दोन्ही स्तरावर जबाबदारीची जाणीव आणि संवेदनशिलतेची अत्यंत आवश्यकता आहे, तरच दोघेही खऱ्या अर्थाने सुरक्षित होतील.